राज्यात माहे जून ते सप्टेबर २०२५ मध्ये अतिवृष्टी व पूर आपत्तीमुळे बाधितांना विशेष मदत पॅकेज (Relief package) व सवलती देण्याच्या अनुषंगाने मार्गदर्शक सूचना.

**महाराष्ट्र शासन**

**कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**

**शासन निर्णय क्रमांकःDAHD-१४०३४/६३/२०२५ (E-१३८३५५८)पदुम-४**

**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,**

**मंत्रालय विस्तार इमारत, मुंबई ४०००३२**

**दिनांक:- २७ मार्च, २०२६**

वाचा-
१. महसूल व वनविभाग शासन निर्णय क्र. सीएलएस-२०२२/प्रक्र३४९ /म-३ (मदत-१) दि. २७/३/२०२३
२. महसूल व वनविभाग शासन निर्णय क्र. सीएलएस-२०२५/प्रक्र३६५ /म-३ (मदत-१) दि. ०९.१०.२०२५ व दि. १०.१०.२०२५
३. मा. मुख्यमंत्री व मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत वेळोवेळी दिलेले निर्देश

**प्रस्तावना** -

जून ते सप्टेबर २०२५ या कालावधीत राज्यातील बहुतांश जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणावर अतिवृष्टी व पुरामुळे आपत्ती उद्भवली आहे. अतिवृष्टी व धरणातील पाणी विसर्गामुळे गंभीर स्वरुपाची पूरपरिस्थितीमुळे पूरग्रस्त भागात पशुधन मृत्यूमुखी पडले / वाहून गेले आहेत. बाधित क्षेत्रातील पशुपालकांना विशेष मदत पॅकेज (Relief package) व सवलती जाहीर केल्या आहेत. त्यानुसार वाचा क्र. १ येथील शासन निर्णयान्वये विहीत करण्यात आलेले राष्ट्रीय नैसर्गिक आपत्ती प्राधिकरणाचे (NDRF) निकष शिथिल करुन सर्व मृत/बेपत्ता पशुधनास तसेच गोठयाच्या नुकसानीपोटी मदतीचे दर उपरोक्त वाचा क्र. २ येथे शासन निर्णयान्वये विहित करण्यात आले आहेत. सदर मदतीचे वितरण करण्यासाठी कार्यप्रणाली / मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती. त्यानुसार पुढील शासन निर्णय निर्गमित करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

**शासन निर्णय:-**

माहे जून ते सप्टेंबर २०२५ या कालावधीत अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या भागातील पशुधन हानीच्या संदर्भात मदत व पुनर्वसन विभागाने उपरोक्त वाचा क्र. २ येथील शासन निर्णयान्वये मदतीचे दर विहित केले आहेत. त्यानुसार पशुसंवर्धन विभागाशी संबंधित मदतीचे दर पुढीलप्रमाणे आहेत:-

| क्र. | बाब | मदतीचे दर |
|---|---|---|
| १ | गोठा | रु. ३०००/- प्रति पडझड झालेला, नष्ट झालेला गोठा |
| २ | मृत जनावरांसाठी | १. दुधाळ जनावरे - रु ३७,५००/- प्रति जनावर<br>२. ओढकाम करणारी जनावरे- रु.३२,०००/- प्रति जनावर<br>३. लहान जनावरे - रु २०,०००/- प्रति जनावर<br>४. शेळी/मेंढी - रु. ४,०००/- प्रति जनावर<br>५. कुक्कुटपालन - रु.१००/- प्रति कोंबडी |

उपरोक्त दराप्रमाणे देण्यात येणाऱ्या मदतीचे वितरण करण्यासाठी पुढीलप्रमाणे कार्यपध्दती विहित करण्यात येत आहे.

**१. महसूल व वन विभागाच्या शासन निर्णय दि. २७.०३.२०२३ मधील शिथिल करण्यात आलेले निकष:-**

१. अल्प, अत्यल्प भूधारक तसेच भूमिहीन पशुपालकांऐवजी सर्व अपादग्रस्त पशुपालक मदतीसाठी पात्र राहतील.
२. प्रत्येक पशुपालकांना कमाल ३ मोठया दुधाळ व ओढकाम करणाऱ्या मोठया जनावरांऐवजी मृत/बेपत्ता असलेली सर्व दुधाळ जनावरे मदतीसाठी पात्र राहतील.
३. प्रत्येक पशुपालकांना कमाल ६ ओढकाम करणाऱ्या लहान जनावरांऐवजी मृत/बेपत्ता असलेली सर्व जनावरे मदतीसाठी पात्र राहतील.
४. प्रत्येक पशुपालकांना कमाल ३० लहान दुधाळ जनावरांऐवजी मृत/बेपत्ता असलेली सर्व जनावरे मदतीसाठी पात्र राहतील.
५. प्रत्येक पशुपालकांना कमाल १०० कुक्कुट पक्षांसाठी रु. १०,०००/- च्या मर्यादेत याऐवजी मृत/बेपत्ता असलेली सर्व कुक्कुटपक्षी मदतीसाठी पात्र राहतील.

**२.मृत/बेपत्ता पशुधनाची खातरजमा :-**

अतिवृष्टीत/पुरात मृत पावलेल्या/वाहून गेलेल्या पशुधनाची किमान खालीलपैकी एका ठिकाणी नोंद असणे आवश्यक राहील.

i. राष्ट्रीय डिजीटल पशुधन अभियानांतर्गत (NDLM) भारत पशुधन ॲपवर नोंदणी.
ii. २१ वी पशुगणनेतील नोंद.
iii. पशुसंवर्धन विभागाकडून राबविण्यात येणाऱ्या नियतकालीक लसीकरणाची नोंदवहीतील नोंद / ऑनलाईन नोंदी.
iv. विमा कंपनीकडील नोंद.
v. दुध अनुदान योजनेत समाविष्ट असलेले पशुधन व त्यांचे मालक याची नोंद.

**३.पंचनामा:-**

I. मृत पशुधनाच्या संदर्भात शवविच्छेदन अहवाल मदतीसाठी ग्राह्य धरण्यात यावा
II. वरील २ मधील (i) ते (v) मध्ये नमूद असलेल्या ठिकाणांपैकी एक ठिकाणी नोंद असलेल्या मृत झाल्यामुळे अथवा पशुधन वाहून गेले असल्यामुळे त्याचा शोध / तपास लागत नाही, अशा पशुधनाच्याबाबतीत संबंधित पशुपालकास मदत मिळण्यासाठी खालील अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत पंचनामा करण्यात यावा.

१.स्थानिक पशुधन विकास अधिकारी,
२.तलाठी,
३.पोलीस पाटील/ सरपंच,
४.ग्राम पातळीवरील सहकारी दूध संघाचे संचालक,
५. संबंधित पशुधनाचे मालक

**४. जिल्हाधिकाऱ्यांना अहवाल सादर करणे.**

स्थानिक तलाठी मृत/वाहून गेलेल्या पशुधनाच्या नुकसानीपोटी जाहीर करण्यात आलेली मदत मिळण्यासाठी मृत पशुधनाच्या संदर्भात शवविच्छेदन अहवाल किंवा बेपत्ता पशुधनाच्या बाबतीत पंचनाम्याची प्रत संबंधित तहशीलदार यांचे मार्फत जिल्हाधिकारी यांना सादर करण्यात येईल.

**५. सर्वसाधारण मार्गदर्शक सूचना:**

I. मृत अथवा बेपत्ता असलेल्या विमाकृत पशुधनास विमा कंपनीकडून नुकसान भरपाई अनुज्ञेय असल्यास संबंधित पशुपालक मदतीसाठी पात्र राहणार नाही.
II. मृत अथवा बेपत्ता असलेल्या पशुधनाच्या मालकाची ओळख निश्चित करण्याची जबाबदारी तलाठी व पोलीस पाटील यांची राहील.
III. मृत अथवा बेपत्ता असलेल्या पशुधनाच्या मालकाचे आधार संलग्नित बँकखात्याचा तपशील पंचनामा/ शवविच्छेदन अहवालासह तहसीलदार यांच्या मार्फत जिल्हाधिकाऱ्यांना उपलब्ध करुन देण्यात येईल.
IV. राष्ट्रीय आपत्ती निवारण निधीच्या निकषाच्या मर्यादेत देण्यात येणारे अर्थसहाय्य राष्ट्रीय आपत्ती निवारण निधीमधून व राष्ट्रीय आपत्ती निवारण निधीचे निकष शिथिल करुन देण्यात येणारे अतिरिक्त अर्थसहाय्य राज्य आपत्ती निवारण निधीमधून भागविण्याची कार्यवाही संबंधित जिल्हाधिकारी करतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०२६०३२७१२५२०८१४०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

MARALE NIWRUTTI BHAGUJI

Digitally signed by MARALE NIWRUTTI BHAGUJI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Agriculture and Adf Dept, 2.5.4.20=8A75C414FF50CE35220C63CD53D2EB1A99A474C02300BEEA74BB051C4C3C90A9, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=5C891DA87D2A4842558454524CC114BA5B2F67A2A80796592830D345500F15CC, cn=MARALE NIWRUTTI BHAGUJI
Date: 2026.03.27 12:52:51 +05'30'

**(नि.भा.मराळे)**

**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत:** -

१. मा. राज्यपाल यांचे सचिव राजभवन मुंबई
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव मंत्रालय मुंबई-३२
३. मा. उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव मंत्रालय मुंबई-३२
४. सर्व मा. मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव मंत्रालय मुंबई-३२
५. मा.विधानसभा /विधान परिषद ( सर्व)
६. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य मंत्रालय मुंबई-३२
७. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव , मंत्रालय मुंबई-३२.
८. अपर मुख्य सचिव (वित्त) महाराष्ट्र राज्य, मंत्रालय मुंबई-३२.
९. प्रधान सचिव (सहकार ) मंत्रालय मुंबई ३२
१०.सचिव( पदुम) मंत्रालय मुंबई ३२
११.आयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय महाराष्ट्र राज्य, मुंबई
१२.जिल्हाधिकारी सर्व
१३.सर्व प्रादेशिक सहआयुक्त, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभाग
१४.सर्व जिल्हा उपायुक्त, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभाग
१५.निवडनस्ती -पदुम -४